नाशिक
दि.१७/०७/२०१९

# प्रेसनोट

## आलोसे राजेंद्र माधवराव शिरवाडकर, उप अभियंता (पुणेगांव कालवा प्रकल्प अधिकारी) लघु पाटबंधारे विभाग नाशिक, ता.जि.नाशिक यांना ३०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | आलोसे राजेंद्र माधवराव शिरवाडकर, उप अभियंता (पुणेगांव कालवा प्रकल्प अधिकारी) लघु पाटबंधारे विभाग नाशिक, ता.जि.नाशिक. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | ३०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची वडाळी भोई येथे शेतजमीन असुन त्यापैकी त्यांची ६४ आर क्षेत्र पुणेगांव कालवा प्रकल्पात गेले आहे. सदर जमिनीची भरपाई म्हणुन तक्रारदार यांना शासनाकडून ५१,००,०००/—रुपये मंजुर झाले असुन सदर रक्कमेचा चेक देण्यासाठी आलोसे राजेंद्र माधवराव शिरवाडकर, उप अभियंता (पुणेगांव कालवा प्रकल्प अधिकारी) लघु पाटबंधारे विभाग नाशिक, ता.जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दि. ०६/०७/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. ०९/०७/२०१९ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे राजेंद्र माधवराव शिरवाडकर, उप अभियंता (पुणेगांव कालवा प्रकल्प अधिकारी) लघु पाटबंधारे विभाग नाशिक, ता.जि. नाशिक यांनी पंच साक्षीदारांसमक्ष तक्रारदार यांचेकडून तडजोडी अंती ३०,०००/— रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आज दि.१७/०७/२०१९ रोजी ला. प्र.वि.नाशिक पथकाने सापळा आयोजित केला असता पुणेगांव कालवा प्रकल्प अधिकारी कार्यालय, सिंचन भवन नाशिक कार्यालयात तक्रारदार यांचेकडून आलोसे राजेंद्र माधवराव शिरवाडकर यांनी स्विकारली असतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन : acbmaharastra.net

टोल फ्री क्र. : १०६४

दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०

व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००


17.7.19

( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता